# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आत्मनिर्भर कृषी विषयक विचार

**निलेश अरूण दूर्गे** अर्थशास्त्र विभाग (सहाय्यक प्राध्यापक) भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय एटापल्ली,
जि.गडचिरोली मो.नं: 9421115541 profnadurge@gmail.com

---

**गोषवारा :**

*भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताच्या इतिहासातील अर्थतज्ञ म्हणून ओळखले जातात. डॉ.आंबेडकरांनी देशातील जाती व्यवस्था, सामाजिक विषमता आणि अस्पृश्यता या विविध समस्येचे आर्थिक दृष्टिकोनातून सोडवणूक केली. त्याचबरोबर डॉ.आंबेडकरांनी देशातील शेती आणि भू-सुधारणा विषयाला महत्त्व देताना शेतीचे राष्ट्रीयकरण गरजेचे मानले. तसेच देशातील शेतमजुराची होणारे शोषण थांबविणे पाहिजे. त्याकरिता देशात सामुदायिक शेतीची संकल्पना मांडली आहे. शेतीच्या उत्पादन वाढीसाठी आधुनिकीकरण बरोबर यांत्रिकीकरण गरजेचे मानले आहे. डॉ.आंबेडकरांनी शेतीच्या प्रगतीसाठी शेतीमध्ये आधुनिक अवजारे, हायब्रीड बी-बियाणे आणि सेंद्रिय खते आवश्यक मानली आहे.तसेच लहान लहान तुकड्यात शेती करण्यापेक्षा सामुदायिक शेतीला चालना दिली आहे. शेतीच्या विस्तारीकरणाकरिता जमिनीचा आकार हा एकत्रित खेड्याची रचना **29** आणि **30** एकर मध्ये असावी, या मताचे डॉ.आंबेडकर होते. तसेच पडीत जमीन लागवटीखाली आणण्यावर अधिक भर दिला आहे. देशातील सिंचन व्यवस्था योग्य पद्धतीने असेल तर देशातील कृषी उत्पादन वाढीबरोबर लोकांना रोजगार वाढ, उत्पादन वाढ, आणि लोकांचे कल्याण साध्य करता येईल.त्याचबरोबर देशाची प्रगती साध्य करून देशाला आत्मनिर्भर वाटचाल करता येते. तसेच शेतीची उत्पादकता वाढीसाठी विविध उपाय डॉ.आंबेडकरांनी सुचविले आहे. त्यामुळे देशाला आत्मनिर्भर करण्यासाठी डॉ.आंबेडकरांचे कृषी विचार आज ही तेवढेच महत्त्वाचे वाटते.*

**बीजशब्द :-** आत्मनिर्भर, कृषी, भू-सुधारणा, अस्पृश्यता, सामुदायिक शेती

**प्रस्तावना :**

माननीय पंतप्रधानांनी स्वातंत्र्यदिनी भारताला आत्मनिर्भर करण्याचे आवाहन केले. प्रो.शूलटझ यांच्या मते, 'कोणताही देश आपल्या अन्नधान्याच्या बाबतीत आत्मनिर्भरता झाल्याशिवाय कोणताही राष्ट्र आर्थिक विकासाची कल्पना करू शकत नाही. याचा अर्थ, देशाला आर्थिक विकासासाठी अन्नधान्य उत्पादनाचे आणि पर्यायाने कृषी क्षेत्राचे अधिक महत्त्व वाढणे गरजेचे आहे, हे विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या आर्थिक तत्त्वज्ञान आणि विविध ग्रंथामध्ये मुद्दे स्पष्ट केले आहे. डॉ.आंबेडकरांनी शेतीचा विकास आणि शेतकऱ्यांच्या जीवनात बदल कसे करू शकते. यांचे त्यांनी आपल्या **'Small Holding in India and their remedies'** या लेखक लिहिले आहे. तसेच डॉ.आंबेडकरांनी आपल्या पीएच.डी.साठी **'The Evolution of Provisional Finance in British India'** हा प्रबंध लिहिला होता. डॉ.आंबेडकरांनी शेती, भू-सुधारणा, आधुनिक शेती, सामुदायिक शेती, जमिनीचे विस्तारीकरण तसेच शेतीसाठी सिंचनाची योग्य व्यवस्था आणि शेतीच्या उत्पादन वाढीला चालला कशा प्रकारे दिले जाऊ शकते यांची अनेक धोरण किंवा विचार मांडले. ज्यामुळे आज डॉ.आंबेडकरांचे कृषी विषयक विचार देशाला आत्मनिर्भर बनण्यास मदत मिळू शकते.

**संशोधनाचे उद्दीष्टये :**

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आत्मनिर्भर कृषीविषयक विचाराचा अभ्यास करणे.
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आधुनिक शेतीविषयक संकल्पना अभ्यासणे.
3. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची सामुदायिक शेती संकल्पना अभ्यासणे.
4. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सिंचन व्यवस्था धोरणाचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी केवळ दुय्यम स्त्रोतांचा वापर केला असून यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विविध पुस्तके, ग्रंथ, नियतकालिका, मासिका, वर्तमानपत्रे व इंटरनेटमधून माहिती घेण्यात आली आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आत्मनिर्भर कृषी विषयक विचार**:

1. **शेती आणि भू-सुधारणा विषयक विचार**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कृषीचा सखोल अभ्यास केला असून त्यांनी भारतीय शेत जमिनीच्या मालकीबाबत विचार मांडले आहेत. कारण भारतातील शेत जमीन विशिष्ट वर्गाकडे एकवटली असून कनिष्ठ जातीच्या शेतमजुराकडे अल्प प्रमाणात शेतीची मालकी आहे. डॉ.आंबेडकरांनी **The Journal of Indian**

**Economics Society** मध्ये **Small Holding in India and Their Remedies** हा लेख **1918** मध्ये प्रकाशित केला. या लेखात डॉ.आंबेडकरांनी राष्ट्रीय उद्योग म्हणून शेतीकडे दृष्टिकोन ठेवला. भारतीय शेतीला अत्यंत गंभीर समस्यासाठी भारतातील लहान धारण क्षेत्र हे जबाबदार असल्याचे मत मांडले. डॉ.आंबेडकरांनी देशातील भू-सुधारणा विषय कायदे, कुळ कायदे, सहकारी शेती आणि भूदान चळवळ यासारख्या विविध मागण्या किंवा उपायामुळे देशातील चालत आलेली परंपरागत स्वरूपाची आर्थिक रचना किती बदलणार याबाबत त्यांना साशंक वाटत होते. त्यांनी भू-सुधारणा विषयक कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी.तसेच त्यांनी जमिनीचे राष्ट्रीयकरण करायला पाहिजे,असे क्रांतिकारी विचार शेतीच्या बाबतीत होते. डॉ.आंबेडकरांच्या मते, शेतीची उत्पादकता ही केवळ जमिनीच्या धारण क्षेत्रावर अवलंबून नसून श्रमिक, भांडवल व इतर आदानावर अवलंबून असते. तसेच योग्य प्रमाणात भांडवल, श्रमिक मुबलक प्रमाणात उपलब्ध असेल तर जमिनीच्या लहान धारण क्षेत्रात सुद्धा जास्तीचे उत्पादन ठरविता येते, असे डॉ.आंबेडकरांचे मत होते.

**2. शेतमजूर विषयक विचार**

भारतातील ग्रामीण व कृषी क्षेत्राशी संबंधित शेतमजूर हा वर्ग प्रमुख घटक आहे. दुसऱ्याच्या शेतीवर उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन म्हणून भारतीय शेतमजूर राबत असल्याचे मत डॉ.आंबेडकरांनी मांडले आहे. भारतीय शेतमजुरांना आपल्या कामाचा वेळ, कामासंबंधी नियोजन तसेच किमान वेतन ठरविण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे शेतमजूर एकप्रकारे गुलाम असल्याचे मत मांडले. शेतमजुरांना कधीकधी आपले काम विनावेतन करावे लागते. तर कधी कामाचा मोबदला म्हणून कमी वेतन मिळत असल्यामुळे शेतमजुरांनी स्थिती अत्यंत हालाखीची आणि गरिबीत जीवन जगावे लागते. तसेच शेतमजुरांमध्ये संघटन नसल्यामुळे त्यांचा फायदा घेता येत नसून त्यांची आर्थिक परिस्थिती अधिक खालावलेली आहे, असे डॉ.आंबेडकरांचे मत होते.

डॉ.आंबेडकरांच्या मते, कामगारांना ज्या विविध सवलती व फायदे मिळतात. तेच फायदे व सवलती है शेतमजुरांना मिळणे आवश्यक मानले. जसे औद्योगिक कामगारांना अपघात विमा, आरोग्य विमा, भविष्य निर्वाह निधी, नुकसान भरपाई इत्यादी विविध स्वरूपाच्या सोयी मिळतात. त्या सोयी शेतमजुरांना मिळणे आवश्यक मानले होते. हे विचार स्वातंत्र्यपूर्व काळातील असले, तरी आज सद्यस्थितीत डॉ.आंबेडकर यांचे विचार आत्मनिर्भर भारतासाठी योग्य ठरू शकते.

**3. शेतीच्या आधुनिकीकरणावर भर**

डॉ.आंबेडकरांच्या मते, भारतातील अल्पभूधारक शेतमजुरांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण जमीनदाराकडून केली जायचे. या अल्पभूधारक शेतकऱ्यांचा फायदा पिळवणूक करून जमीनदार वर्ग घेत होते. तसेच शेती करणारे लोक गरीबीत जीवन व्यथित करीत होते. शेतीमध्ये परिवर्तन करण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी शेतीमध्ये यांत्रिकीकरण करणे गरजेचे मानले. तसेच शेतीच्या उत्पादन वाढीसाठी त्यांनी सेंद्रिय खते, बी-बियाणे आणि आधुनिक अवजारांचा वापर करण्याचे मत सुचविले. शेतीच्या उत्पादन वाढीसाठी जलसिंचनाची सोय गरजेचे मानले आहे.

देशातील ग्रामीण भागाचा विकास घडवून आणणे, यावर आणखी त्यांनी भर दिला. तसेच ग्रामीण भागातील बरीच गावरान जमीन पडीत असून ती जमीन जर भूमिहीन शेतमजुरांना सामूहिक लागवडीसाठी दिल्यास उत्पादनात भर पडेल आणि देशातील राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा वाढे. तसेच डॉ.आंबेडकरांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी शेतीला राष्ट्रीय दर्जा मिळणे गरजेचे मानले होते.आणि त्यासाठी प्रयत्न सुद्धा केले होते.

**4. सामुदायिक शेती**

सामुदायिक शेतीसाठी डॉ.आंबेडकरांनी प्रा.एच.एस.जेव्होन यांचे सिद्धांत मान्य केले होते. त्यामध्ये प्रथम टप्प्यात "सर्वप्रथम शक्यतो सक्ती करण्याचे टाळण्यात यावे. तसेच त्या भागातील निम्म्याहून अधिक जमीन मालकांनी बदलाची इच्छा व्यक्त केल्या खेरीज त्यांच्यावर कोणताच खर्च लागायचा नाही हे तत्व स्वीकारावे. दुसऱ्या टप्प्यात, कार्यवाहीचा खर्च कमी ठेवावा. तिसऱ्या टप्प्यात, योजना काही वर्ष प्रायोगिक तत्त्वावर राबवावी. चौथ्या टप्प्यात, सध्याच्या वहीवर कायद्यात दुरुस्ती करावी. आणि पाचव्या टप्प्यात, स्वाभाविक परिस्थितीत जमिनीचे वाटप समान स्तरावर केले जावे.आणि ती व्यक्ती भूमिहीन होईल. त्यांना नुकसान भरपाई द्यावी."

डॉ.आंबेडकरांच्या मते, सामुदायिक शेती करणे म्हणजे जमिनीच्या मालकीचा विस्तार करणे, हा मुद्दा आवश्यक मानला. तसेच जोपर्यंत जमिनीवर ताण आहे तोपर्यंत जमिनीचे एकत्रिकरण करणे सोपे नाही.आणि हे जमिनीचे लहान लहान तुकडे टाळण्यासाठी औद्योगीकरण करणे गरजेचे मानले. तसेच शेतीचे लहान आणि विस्कळीत शेतजमिनीमुळे उत्पादन कमी होते. त्याकरिता औद्योगीकरणाशिवाय दुसरा पर्याय नाही, असे आंबेडकरांचे मत होते. तसेच भारतीय समाज व्यवस्थेत समता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी सामुदायिक शेतीची गरज मान्य केली. म्हणून राज्य समाजवादाची संकल्पना

डॉ.आंबेडकरांनी मांडली आहे. सामुदायिक शेतीसाठी शेतीचे राष्ट्रीयकरण करणे आवश्यक मानले. या सामुदायिक शेतीमुळे काही भाग सरकारला द्यावा आणि शिल्लक भाग हा जमीनदारांनी ठेवावा असे डॉ.आंबेडकरांचे मत होते.

**5. जमिनीचे विस्तारीकरण**

1917 साली डॉ.आंबेडकरांनी 'भारतातील लहान शेतजमिन आणि त्यावरील उपाय' हा अग्रलेख लिहिला. त्यामध्ये देशातील लहान मालमत्ता शेत जमिनीचे एकत्रिकरण, शेतजमिनीचे विस्तारीकरण आणि भारतीय शेतीचे महत्व यावर स्पष्टीकरण दिले आहे. तसेच शेती ही आर्थिक दृष्ट्या मिळकत असले पाहिजे. शेत जमिनीचा आकार मांडताना डॉ.आंबेडकरांनी प्रा.जेव्होन यांच्या विचारांना मान्य केले आहे. प्रा.जेव्होन यांच्या मते, 'जमिनीचा आकार हा एकत्रित खेड्याची रचना 29 किंवा 30 एकरामध्ये असावा.' हे मत आंबेडकरांनी मान्य केले. डॉ.आंबेडकरांनी खेड्यातील जमिनीचा आकार हा 100 किंवा 200 एकर असण्यास मान्य नव्हते, तर जमिनीचे विस्तारीकरणात एकरांची मर्यादा ठेवण्यात येऊ नये.

शेतीच्या आकाराबद्दल डॉ.आंबेडकरांनी प्रा.आर.टी.इली यांचे मत मांडतात. "चांगला हेतू असूनही त्यांच्या कार्याचा शेवट हानिकारक ठरणार आहे. कारण शेतजमिनीचा आकार हा शेती करणाऱ्या शेतकऱ्याखेरीज अन्य कोणीही हिरावू शकत नाही. त्यांना पूर्णपणे माहिती असते की, त्याच्या शेतीचा आकार प्रसंगी बदलू शकतो. ज्या आधारे शेतकरी त्यांच्या शेतीचा आकार कमी जास्त करू शकतो. त्या उपकरणांमध्ये, साधनांमध्ये बदल झाल्यास कधी त्याला शेतजमिनीचा लहान आकार योग्य वाटू लागेल. तर कधी शेतजमिनीचा आकार मोठा करावा असे वाटू लागेल. म्हणून तो गरीब, काटकसरी मनुष्य ठरतो." डॉ.आंबेडकर यांच्या मते, शेत जमिनीचा आकार हा आर्थिक मिळक्तेवर अवलंबून नसून तो जमीन लागवटीच्या क्षमतेनुसार कमी जास्त असतो. डॉ.आंबेडकरांचे जमिनीचे विस्तारीकरणामधील मत हे आजच्या आत्मनिर्भर भारतासाठी प्रेरक विचार योग्य मानता येऊ शकते.

**6. सिंचन व्यवस्था**

डॉ.आंबेडकर यांच्याकडे सन 1942 ते 1946 या कालावधीत केंद्रीय मंत्री म्हणून ऊर्जा, सिंचन आणि श्रम खात्याचा प्रभार होता. त्यामुळे त्यांनी भारताच्या केंद्रीय पातळीवर जल आणि ऊर्जा धोरणाची सुरुवात केली. 1940 च्या दशकात आर्थिक नियोजन स्वीकारताना आंबेडकरांनी नियोजित पद्धतीने विकास साध्य करण्याकरिता देशातील जल आणि ऊर्जा साधनांमध्ये मौल्यवान भूमिका पार पाडली होती. डॉ.आंबेडकरांनी नदी खोरे(पानलोट) क्षेत्रात जल संधारणाचा विकास करण्यासाठी सिंचन योजनेच्या नियोजनाकरिता बहुउद्देशीय दृष्टिकोन योग्य मानला होता. उदा. जलवाहतूक, कृषी सिंचन, विजनिर्मिती, पिण्याचे पाणी, मुद्रा संवर्धन, पूरनियंत्रण आणि काही पाणी उद्योगासाठी राखीव ठेवणे हे गरजेचे उद्दिष्टे आहे.त्यांनी पाणलोट क्षेत्र प्राधिकरणासारखी प्रशासकीय प्रणालीकरिता जल प्रकल्प राबविणे महत्त्वाचे मानले.

डॉ.आंबेडकर यांच्याकडे नोव्हेंबर 1944 मध्ये मध्यवर्ती तांत्रिक ऊर्जामंडळ आणि एप्रिल 1945 मध्ये मध्यवर्ती जलमार्ग, जलसिंचन आणि नौकायन आयोग या आयोगाकडे नियोजन व समन्वयाची तसेच जल संसाधनाचा नियोजन योग्य वापर करण्याबद्दल प्रांतिक सरकारचा सल्लागार म्हणून काम केले. तसेच दोन राज्यातील नदी खोरे प्रकल्पातील प्रश्न सोडविण्याकरिता आंबेडकरांनी नदी खोरे प्राधिकरण किंवा महामंडळे स्थापन करावे असे सुचविले. बहुउद्देशीय प्रकल्प आणि त्यांची सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण विकासाच्या उद्दिष्टासाठी सांगड महत्त्वाची असते. ज्यामुळे समग्र विकासाचे उद्दिष्टे साध्य करता येऊ शकते. यासाठी राज्य सरकार, स्थानिक सरकार आणि नदीखोरे प्राधिकरण यांच्यातील समन्वय असणे गरजेचे मानले.

**7. भारतीय शेतीची उत्पादकता वाढण्यासाठी उपाय**

डॉ.आंबेडकरांनी सामुदायिक शेतीचे प्रयोग राबविणे गरजेचे मानले.शेतीचे राष्ट्रीयकरण असावे. सहकारी शेतीमुळे जमिनीचे लहान लहान तुकड्याचे वाटप थांबविता येईल. तसेच शेतीच्या विकासासाठी भांडवल पुरवठा योग्य असावा.आणि शेती करिता सिंचन, वीज जोडणी, आधुनिक यंत्रसामग्री, बी-बियाणे व त्यात बँकेची भूमिका महत्त्वाची मानली. भारतीय शेती हंगामी स्वरूपाची असून शेतीच्या भांडवलाकरिता सावकारांच्या पाशात अडकवली जाते. ते दूर करण्याकरिता सरकारने ग्रामीण भागातील बँकेकडे भांडवल व्यवस्थेचे योग्य नियोजन करणे महत्त्वाचे मानले. त्यामुळे शेतीच्या विकासाकरिता यंत्रसामुग्रीचा पुरवठा आणि योग्य भाग भांडवल मिळाल्यास शेतीची उत्पादकता नक्की वाढ होईल.

**निष्कर्ष**

एकंदरीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेती आणि भू-सुधारणा विषयक विचार मांडताना त्यांनी भू-सुधारणा कायद्याची अंमलबजावणी प्रभावी आणि जमिनीचे राष्ट्रीयकरण याचा विचार मांडला. शेतमजुराविषयी त्यांनी संघटन असणे गरजेचे मानले. त्यामुळे शेतमजुरांना कामाचे वेतन निश्चित ठरविता येऊ शकते. तसेच शेतीच्या

आधुनिकीकरणासाठी यांत्रिकरण गरजेचे मानले. सेंद्रिय खते, बी-बियाणे आणि आधुनिक अवजाराचा वापर योग्य मानला. सामुदायिक शेतीसाठी त्यांनी लहान लहान तुकडे एकत्रिकरण योग्य मानले. सिंचन व्यवस्था देशातील कृषी व्यवस्थेचे उत्पादन वाढीबरोबर देश प्रगत होऊन आत्मनिर्भर्तेकडे वाटचाल करेल, असे डॉ.आंबेडकरांचे विचार महत्वपूर्ण वाटते.

**संदर्भः-**

1. गवळी प्रा.टी.एम.,(संपादक 2011), बाबासाहेब गौरव ग्रंथ प्रकाशन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
2. जाधव डॉ.नरेंद्र, (2010), डॉ.आंबेडकर यांचे आर्थिक विचार, सुगावा प्रकाशन, पुणे
3. थोरात सुखदेव,(2005), डॉ.बाबासाहेब आंबेडकर नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान, सुगावा प्रकाशन, पुणे
4. बनसोड एस.एम.,(2002), डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विविध पैलू, जागृत प्रकाशन, औरंगाबाद/संभाजीनगर
5. डाहाट धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार, खंड 04(कृषी), संकेत प्रकाशन, नागपूर
6. अर्थसंवाद,(जुलै-सप्टेंबर 2019), मराठी अर्थशास्त्र परिषद, नियतकालिका खंड 43, अंक 2
7. आंतरराष्ट्रीय चर्चासत्र,(13 व 14 फेब्रुवारी 2018), डॉ.आंबेडकर ए नॅशनल बिल्डर, व्हॉल्युम 2,